# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील २० वा रविवार – न्याय रविवार

## १८ ऑगस्ट २०२४ श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू :** वंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

**प्रतिसाद : प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, विशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी पवित्र आत्म्याची विशेष कृपा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी व अधिका-यांनी देशाचा कारभार पाहताना जात, धर्म व पक्ष याकडे लक्ष न देता समाजात न्याय प्रस्थापित करून निरपराधी नागरिकांवरील अत्याचार दूर करावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. प्रभू येशू म्हणतात माझे शरीर खरे अन्न व माझे रक्त खरे पेय आहे. या जीवनाच्या ख-या भाकरीची व पेयाची आपल्याला गोडी लागावी व पवित्र मिस्सा बलिदानात सहभागी होऊन आपण ख्रिस्ताच्या पवित्र शरीराचे व रक्ताचे भक्तीभावे सेवन करावे म्हणून प्रार्थना करू या.

४. आज न्याय रविवार पाळत असताना समाजातील सर्व स्तरावर न्याय प्रस्थापित व्हावा, कुटुंबातील न्यायी व शिस्तपूर्ण जीवनाद्वारे तरूणांनी समानता, शांती व न्यायाचा तेजोमय दीप प्रज्वलित ठेवावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेष करून जे आजारी आहेत त्यांच्यावर प्रभूचा वरधहस्त असावा, जगातील सामाजिक व आर्थिक विषमता दूर व्हावी, अतिवृष्टी व पूरामुळे जीवन विस्कळतीत झालेल्यांना साहाय्य मिळावे तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू :** हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.